# ‘डीजे’ नाही तरीही ‘आवाज’

## शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरण शास्त्र विभागाचा निष्कर्ष

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

यंदाच्या मिरवणुकीत डीजे दणाणला नाही; पण महाद्वार रोड, गुजरी कॉर्नर, पापाची तिकटी या मुख्य विसर्जन मार्गावर गतवर्षीपेक्षा आवाज वाढल्याचा निष्कर्ष शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरण शास्त्र विभागाने अभ्यासाअंती नोंदविला आहे. रात्री १० ते १२ या कालवधीमध्ये हा अभ्यास करण्यात आल्याची माहिती पर्यावरण शास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठातर्फे शहराच्या प्रमुख भागांमध्ये आवाजाची तीव्रता मोजण्यात आली. त्यामध्ये शांतता क्षेत्र, निवासी, व्यावसायिक आणि औद्योगिक असे चार विभाग करण्यात आले होते. विसर्जन मिरवणूक होत असलेला परिसर प्रामुख्याने व्यावसायिक क्षेत्रामध्ये येतो. यावेळी केलेल्या अभ्यासात २०१६, २०१७ आणि २०१८ ची आकडेवारी मांडण्यात आली आहे. यात २०१७ पेक्षा यंदाच्या मुख्य मिरवणुकीच्या ठिकाणी आवाजाची तीव्रता अधिक असल्याचे स्पष्ट झाले आहे, तर शहराच्या इतर भागात मात्र काही अपवाद वगळता आवाजाची तीव्रता गतवर्षीपेक्षा कमी होती, तर या तिन्ही वर्षी सी.पी.सी.बी.च्या निकषानुसार ठरवून दिलेल्या स्टँडर्सपेक्षा आवाजाची पातळी अधिक होती. हा अभ्यास विद्यापीठ विभागातील पर्यावरण शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. पी. डी. राऊत, सहायक प्राध्यापिका डॉ. ए. एस. पाटील, सहायक प्राध्यापिका पल्लवी भोसले, संशोधक विद्यार्थी असलेले चेतन भोसले, एम. एस्सी.चे विद्यार्थी अर्णव दांबे यांनी केला.

**व्यावसायिक क्षेत्र - आकडेवारी डेसिबलमध्ये**

| | २०१६ | २०१७ | २०१८ |
|---|---|---|---|
| मिरजकर तिकटी | ९६ . १ | ७७. ७५ | ७६. ८३ |
| बिनखांबी मंदिर | ९६. ५ | ८४. ६६ | ८४. ३२ |
| महाद्वार रोड | ९९. ५ | ७१. ६३ | ९९. २४ |
| गुजरी कॉर्नर | ९७. १ | ७४. ९२ | ८५. ७६ |
| पापाची तिकटी | ९८. ६ | ८२. ७३ | ८४. ३५ |
| राजारामपुरी | ७०. २ | ६३. ७२ | ६०. ८५ |
| लक्ष्मीपुरी | ६७. ८ | ७२. ५२ | ६०. ८ |
| गंगावेस | - | ८५ . ४३ | ८४. ७८ |

### कोल्हापूर राज्याला दिशादर्शक बनेल

गेल्या वर्षापासून डीजेमुक्त मिरवणुकीची मोहीम करवीरवासीयांनी हाती घेतली आहे. अजून आपण या मोहिमेच्या सुरुवातीच्या टप्प्यावर आहोत. यावर्षी मंडळांनी डीजेशिवाय मिरवणूक पार पाडली. आवाजाच्या तीव्रतेमध्येही घट झाली आहे. त्यामुळे भविष्यात वायुप्रदूषणमुक्त गणेशोत्सव साजरा करण्यात राज्याला दिशादर्शक असा उत्सव साजरा करू.

**– डॉ. पी. डी. राऊत,**
विभागप्रमुख, पर्यावरण शास्त्र




**कोल्हापूर : ढोल-ताशांच्या गजरात गणेश मंडळाची विसर्जन मिरवणूक.** (छाया : पांडुरंग पाटील)

पुढारी

डीजेसारख्या वाद्यांचा थेट शरीरावर परिणाम होतो. कारण, यातून निर्माण होणारी कंपणे हृदयाची धडधड वाढवतात; पण ढोल, ताशे आदी पारंपरिक वाद्यांचा शरीरावर अपायकारक परिणाम होत नाही. तसेच ही वाद्ये डीजेसारखी कर्णकर्कश वाटत नाहीत. लोकांच्या आरोग्याचा विचार केला, तर नागरिकांनी उत्सवाचा आनंद लुटला, असे म्हणता येईल. – **प्रा. डॉ. पी. डी. राऊत**, विभागप्रमुख, पर्यावरणशास्त्र

पुढारी

# ध्वनी प्रदूषणात किंचित घट

- मिरवणुकीत रात्री दहा ते बारा आवाजाची चाचणी
- विद्यापीठ पर्यावरण शास्त्राचा अहवाल
- 'नो डीजे' मुळे नागरिकांनी लुटला आनंद; अभ्यासकांचे निरीक्षण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

यंदा गणेश विसर्जन मिरवणुकीत डीजे वाजले नाहीत; पण पारंपरिक वाद्यांचा मात्र कडकडाट जोमात होता. त्यामुळे तीन वर्षांच्या ध्वनी मर्यादेच्या तुलनेत फार मोठा फरक पडला नाही. किंचित काही परिसरात आवाज कमी दिसला. मिरवणुकीच्या मुख्य मार्गावरील महाद्वार रोड, न्यू गुजरी कॉर्नर, पापाची तिकटी या परिसरात आवाजाची मर्यादा जास्त होती. रहिवासी क्षेत्रातील शिवाजी पेठ, राजारामपुरीतही आवाज मोठा, तर मंगळवार पेठ, उत्तरेश्वर, नागाळा पार्कात तुलनेने कमी राहिला. न्यायालय, सीपीआर, शिवाजी विद्यापीठ आदी शांतता क्षेत्रांत आवाजाची शांतता दिसली.

शिवाजी विद्यापीठ पर्यावरण विभागाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेश विसर्जन मिरवणूक मार्गावर रात्री १० वा. ते मध्यरात्री १२ वा. या कालावधीत ध्वनी चाचणी घेण्यात आली. याबाबतचा अहवाल विद्यापीठाच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आला.

शांतता क्षेत्रातील तुलनेने कमी आवाज ही यंदा समाधानकारक गोष्ट दिसून आली. कारण, सीपीआर परिसरात ५४.९१ डेसिबल आवाज नोंदवला गेला. तर गतवर्षी हाच आवाज ५५.६३ आणि २०१६ साली ६७.६ इतका नोंदवण्यात आला.

**मागील तीन वर्षांतील आकडेवारी**

| झोन | ठिकाण | २०१६ | २०१७ | २०१८ |
|---|---|---|---|---|
| सायलंट | सीपीआर | ६७.६ | ५५.६३ | ५४.९१ |
| | न्यायालय | ६३.२ | ५८.०९ | ५४.३ |
| | जिल्हाधिकारी कार्या. | ६४.१ | ५६.२४ | ५६.६३ |
| | शिवाजी विद्यापीठ | ५५.२ | ४६.३६ | ४३.६१ |
| रेसिडेंशियल | राजारामपुरी | ६२.४ | ४९.१३ | ५१.३३ |
| | उत्तरेश्वर पेठ | ६३.५ | ६६.२४ | ६४.४७ |
| | शिवाजी पेठ | ६३.८ | ५०.९६ | ६९.१३ |
| | मंगळवार पेठ | ७९.९ | ६०.८५ | ५७.०३ |
| | नागाळा पार्क | ५८.५ | ५०.९६ | ४६.८ |
| | ताराबाई पार्क | ६१.८ | ४८.२४ | ४७.९५ |
| कमर्शियल | मिरजकर तिकटी | ९६.१ | ७७.७५ | ७६.८३ |
| | बिनखांबी गणेश मंदिर | ९६.५ | ८४.६६ | ८४.३२ |
| | महाद्वार रोड | ९९.५ | ७१.६३ | ९९.२४ |
| | गुजरी कॉर्नर | ९७.७ | ७४.९२ | ८५.७६ |
| | पापाची तिकटी | ९८.६ | ८२.७३ | ८४.३५ |
| | राजारामपुरी | ७०.२ | ६३.७२ | ६०.८५ |
| | लक्ष्मीपुरी | ६७.८ | ७२.५२ | ६०.८ |
| | शाहूपुरी | ६७.७ | ५४.१३ | ५४.४२ |
| | गंगावेस | .... | ८५.४३ | ८४.७८ |
| | बिंदू चौक | .... | ७७.३६ | ७२.१६ |
| इंडस्ट्रीयल | उद्यमनगर | ६७.५ | ५५.६२ | ५२.६ |
| | वाय. पी. पोवारनगर | ६१.३ | ५४.३३ | ५९.१८ |

# आवाज 'खाली' पण मर्यादाभंगच

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

सार्वजनिक गणेशोत्सव विसर्जन मिरवणूक मार्गावरील ध्वनीप्रदूषणाचा आवाज गत दोन वर्षांच्या तुलनेत यंदा खाली आला आहे. मात्र केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमानुसार ध्वनीमर्यादेचा भंग झाला आहे. शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरण विभागातर्फे रविवारी मिरवणूककाळात रात्री दहा ते बारा या वेळेतील ध्वनीमर्यादेच्या पाहणीअंती हा निष्कर्ष काढण्यात आला आहे.

पर्यावरण विभागातील तज्ज्ञ प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थ्यांच्या टीमने रविवारी ध्वनीमर्यादेची तुलनात्मक मोजणी केली. यामध्ये शांतता क्षेत्र, रहिवासी क्षेत्र, व्यावसायिक व औद्योगिक क्षेत्र अशा चार भागांमधील ध्वनीप्रदूषणाच्या आलेखाची पाहणी केली. यामध्ये गणेशोत्सव विसर्जन मुख्य मिरवणूक मार्गात समाविष्ट होणाऱ्या बिंदू चौक, मिरजकर तिकटी, बिनखांबी गणेश मंदिर, महाद्वार रोड, गुजरी कॉर्नर, पापाची तिकटी, गंगावेश या मार्गावरील काही ठिकाणी ध्वनीप्रदूषणाची मर्यादा गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी झाली आहे.

मिरजकर तिकटी येथे २०१६ ला ध्वनीपातळी ९६.१ एलईक्यू इतकी होती. यंदा याठिकाणी रात्री दहा ते बारा यावेळेत ध्वनीपातळी ७६.८३ एलइक्यू इतकी असल्याचे नोंद झाले आहे. बिनखांबी गणेश मंदिर आवारात ध्वनीपातळी गेल्यावर्षी ८४.६६ एलइक्यू होती, जी यंदा ८४.३२ पर्यंत खाली आली. मात्र मुख्य मिरवणूक मार्ग असलेल्या महाद्वार रोड व गुजरी कॉर्नर येथे मात्र आवाजाची पातळी गेल्यावर्षीच्या तुलनेत वाढली आहे.

> दोन वर्षांच्या तुलनेत यंदाची ध्वनीपातळी मोजण्यात आली. काही ठिकाणी ध्वनीपातळी कमी झाल्याचे दिसून आले असले तरी अधिकृत मर्यादेपेक्षा ही पातळी जास्त आहे. पारंपरिक वाद्यांचा आवाज ध्वनीमर्यादा ओलांडणारा ठरला तरी त्याचा शरीरावर परिणाम होण्याची शक्यता खूप कमी असते. त्यामुळे पारंपरिक वाद्ये ध्वनी मर्यादेच्यादृष्टीने हानिकारक ठरू शकत नाहीत.
>
> डॉ. पी. डी. राऊत,
> विभागप्रमुख, पर्यावरण विभाग

## विद्यापीठाच्या ध्वनीप्रदूषण पाहणीतील निष्कर्ष

गेल्यावर्षी या दोन्ही ठिकाणी ७१ ते ७४ एलइक्यू ध्वनीपातळी होती, जी यावर्षी ८५ ते ९९ एलइक्यूपर्यंत वाढल्याची नोंद झाली आहे. पापाची तिकटी येथे दोन वर्षांपूर्वी उच्चध्वनियंत्रणेमुळे ९८ एलइक्यूपर्यंत असलेली ध्वनीपातळी यंदा या ठिकाणी पारंपरिक वाद्यांमुळे ८४ एलइक्यूपर्यंत खाली आली आहे.

ध्वनीपातळी मोजणी करण्याच्या मोहिमेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरण विभागाचे प्रमुख डॉ. पी.डी. राऊत, सहाय्यक प्राध्यापक डॉ. आसावरी जाधव, पल्लवी भोसले, संशोधक विद्यार्थी चेतन भोसले यांच्यासह अर्णव जाधव या विद्यार्थ्यांचा समावेश होता.



शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी पंचगंगा घाट परिसरात स्वच्छता मोहीम राबवली.